पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ७
सभावृत्तांत

दिनांक - ०२/०९/२०१५ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.२/९/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

**१ मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर – सभापती**
२ मा.आल्हाट मंदा उत्तम
३ मा.आशा सुपे
४ मा.अनुराधा देविदास गोफणे
५ मा.सुरेखा शंकर गव्हाणे
६ मा.अजित दामोदर गव्हाणे
७ मा.संजय मल्हारराव वाबळे
८ मा.संजय निवृत्ती आहेर – स्विकृत सदस्य
९ मा.विजयराव रसाळ - स्विकृत सदस्य
१० मा.प्रकाश सोमवंशी - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.क्षेत्रीय अधिकारी- श्रीम.आशादेवी दुरगुडे, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.गायकवाड जी.कृ. (कार्यकारी अभियंता स्थापत्य), (मा.श्रीम.प्रभावती मा.पाटील- पर्यवेक्षक, मा.श्री.इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.श्री.व्ही.सी.काळे – उपअभियंता, मा.श्री.वाघमारे एस.बी.-उपअभियंता, मा.साबळे भाऊसाहेब, उपअभियंता, मा.जी.एन.खेरे – सहा.निरीक्षक, मा.एस.डी.रावते - मा.एस.व्ही.बर्डे –समाजसेवक , मा.हनवते पी.एस.समाजसेवक,(नावियो विभाग) मा.एम.एम. चव्हाण – उपअभियंता (विद्युत), मा.श्री.व्ही.बी.माने, उप अभियंता, नगररचना, मा.गरजे - उप अभियंता, नगररचना, मा. वाघमारे एस.बी. उप अभियंता, स्थापत्य, मा.कोंडे के.बी. उप अभियंता, (पाणीपुरवठा), मा.मनोज सेठीया – उपअभियंता, (जलनि:सारण) मा.शितोळे - उपअभियंता, (जलनि:सारण), मा.भोकरे रविंद्र- सहा.आरोग्य अधिकारी, श्री.पाटील एस.वाय.- उपअभियंता (स्थापत्य)

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**(सन्मा. तीन स्विकृत सदस्य यांचे स्वागत करुन त्यांनी आपली स्वत:ची ओळख करुन दिली. तसेच इ क्षेत्रीय कार्यालयात नवीन रुजू झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांची ओळख करुन दिली.)**

अ) दिनांक ०५/०८/२०१५ रोजीची झालेली तहकूब सभा दिनांक २६/८/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक २१/०८/२०१५रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यक्रमपत्रिका ६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----

ठराव क्रमांक- १३ विषय क्रमांक- १

दिनांक- २/९/२०१५

सूचक- मा. अनुमोदक- मा.

संदर्भ – मा.विश्वनाथ लांडे यांचे पत्र

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील लांडेवाडी प्रभाग क्र. ३६ येथील लांडेवाडी गुळवेवस्ती मधील विकास कॉलनी येथील स्वागत कमाणीचे काम पुर्णत्वावर आलेले आहे येथील वाचनालयाचे नाव विश्व माऊली संत ज्ञानेश्वर महाराज वाचनालय असे असल्याने या कमानीस वाचनालयाचे नाव देण्यात यावे असे येथील नागरीकांची मागणी आहे. तरी प्रभाग क्र. ३६ लांडेवाडी मधील विकास कॉलनी भोसरी येथील स्वागत कमानीस विश्व माऊली संत ज्ञानेश्वर महाराज नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/४७६/२०१५
दिनांक- २२/०९/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
**( इ क्षेत्रीय कार्यालय)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दि.२/९/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** मागच्या मिटींगच्या वेळेस टेंडर संबंधी जो विषय झाला व टेंडर बाबत अहवाल तयार करणेबाबत सुचविले होते तो अहवाल तयार झाला आहे का?

**मा.व्ही.सी.काळे – (उपअभियंता)** इ क्षेत्रीय कार्यालयाचे एकूण २९७ निविदा होते. १६३ कामे निविदेला दिलेली आहेत. मोशी येथे ४२ कामे आहेत त्यापैकी १४ कामे प्रसिध्द केली आहेत. इंद्रायणीनगर येथील २३ कामापैकी १५ कामे प्रसिध्द केली आहेत. चक्रपाणी वसाहत येथील २३ कामापैकी ११ कामे प्रसिध्द केली आहेत. दिघी येथील २३ कामापैकी १५ कामे प्रसिध्द केली आहेत. सॅण्डविक कॉलनी येथील ३४ कामापैकी १५ कामे प्रसिध्द केली आहेत. गवळीनगर येथील २४ कामापैकी २१ कामे प्रसिध्द केली आहेत. गव्हाणे वस्ती येथील १७ कामापैकी १७ कामे प्रसिध्द केली आहेत. मोशी येथील ४४ कामापैकी १६ कामे प्रसिध्द केली आहेत. लांडेवाडी येथील १९ कामापैकी १० कामे प्रसिध्द केली आहेत. अशा प्रकारे कामे आपण निविदेला दिलेली आहेत. त्याबाबतची फाईल मंजूर होऊन येणार आहे. दहा लाखासाठी एकूण ८० कामे प्रभागामध्ये आहे. त्यापैकी ६३ कामे आहेत. त्यांचे टेंडर झालेले आहे. सर्व कामे प्रोसेस मध्ये आहे. मुख्य कार्यालयाकडील दोन कामे प्रसिध्द केलेली आहेत. दिघी, इंद्रायणीनगर येथील दोन टेंडर प्रसिध्द केले आहे. ६८ कामे आपण करणार आहोत. सगळी कामे ओपन झाली आहेत. मुख्य कार्यालयाकडील १०० कामे आहेत. व **प्रभागातील** ६३ कामे आहेत. असे एकूण १६३ कामे निविदा प्रसिध्द केले आहेत. विशेष कामे दोन प्रसिध्द केली आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर , सभापती -** बाकीची कामे होणार आहेत का?

**मा.व्ही.सी.काळे – (उपअभियंता)** - स्थापत्य विषयक काही कामे आपण आर्किटेक्चरला दिली आहेत. त्याचे प्लॅनिंग सध्या चालू आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** आर्किटेक्चरला कोणती कामे दिली आहेत?

**मा.अजित गव्हाणे -** तुम्ही एवढे हूषार असताना आर्किटेक्चरची तुम्हाला काय गरज आहे.

**मा.व्ही.सी.काळे – (उपअभियंता)** - स.नं. १३१ वडमुखवाडी येथील स्विमींग टँक, च-होली येथील जीम, कुस्ती प्रशिक्षण केंद्र भोसरी भाजीमंडई, या कामासाठी आर्किटेक्चरची गरज लागणार आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर,सभापती –** १८ मीटर रस्ता, २४ मीटर रस्ता याकरिता आर्किटेक्चर नेमण्याची गरज आहे का?

**मा.व्ही.सी.काळे – (उपअभियंता)** - स्थापत्य विषयक काही कामे महत्वाची असल्यामुळे आर्किटेक्चरची गरज वाटते.

**मा.अजित गव्हाणे –** एलबीटीमुळे उत्पन्न कमी होणार आहे. अशा परिस्थितीत प्रभागातील सगळी कामे करणे प्रभागातील सगळयांची जबाबदारी आहे. लवकरात लवकर कामे करुन घ्या. नाही तर प्रत्येक कामांना कात्री लागेल.

**मा.मंदा आल्हाट –** मोशी येथील मार्केट मध्ये ४०/६० आकाराचे होर्डींग लागले आहे त्यावर तुम्ही कारवाई का करीत नाही. तुम्ही त्यांना नोटीस दया. तेथे आता खड्डे करायला लागले आहेत. किती दिवस झाले तेथे काम चालू आहे. जेसीबी लावून खड्डे करण्याचे काम चालू आहे. तुम्ही यावर कारवाई केली पाहिजे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** होर्डींगबाबतचे काम आकाशचिन्ह परवाना विभागाकडे आहे. आम्ही ते काम करीत नाही.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** आता जी कामे झाली आहेत ती कुठली कुठली कामे झालेली आहेत.

**मा.व्ही.सी.काळे – (उपअभियंता)** - डीवायपाटील येथील कामकाजासंबंधी श्री. पठारे यांनी ऑब्जेक्शन घेतले आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती -** च-होली येथील खाणीच्या कामाचे काय झाले?

**मा.व्ही.सी.काळे – (उपअभियंता)** - मा.स्थायी समितीमध्ये टेंडर मंजूरीसाठी विषय ठेवला आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती -** जलतरण तलावाबाबत काय झाले व ड्रेनेज संदर्भातील कामे किती चालू आहेत.

**मा.शितोळे- उपअभियंता (ड्रेनेज) –** गणेशनगर येथे काम चालू आहे. बाकी काही ठिकाणची कामे झाली आहेत.

**मा.अजित गव्हाणे –** सध्या किती कामे शिल्लक आहेत. प्रत्येक प्रभागाला वेगवेगळी अमाऊंट आहे का?

**मा.शितोळे- उपअभियंता (ड्रेनेज) –** ३७ लाखांची कामे आहेत. मोशीमध्ये काम चालू आहे. ४९ लाखाचे काम चालू आहे. तीन ते साडेतीन हजार मीटर कामे होईल.

**मा.अजित गव्हाणे –** स्थापत्य विभाग व जलनि:सारण विभागाचे कम्युनिकेशन असले पाहिजे.

**मा.शितोळे- उपअभियंता (ड्रेनेज) –** मोशी, च-होली, दिघी येथील साडे सदोतीस लाखाचे काम आहे. सीएमएच्या भिंतीचे काम चालू आहे. मुंबई महापालिकेकडून माहिती मागविली आहे. पुटअप करुन मान्यता घेत आहोत. ज्या ठिकाणी काम चालू तेथे रॉक (खडक) आहे. त्यामुळे सीएमएची भिंत हादरते.

**मा.अजित गव्हाणे –** ड्रेनेजच काम केल्यानंतर ते काम चेक करता का?

**मा.मनोज सेठिया –उपअभियंता (ड्रेनेज) –** ड्रेनेजचे काम झाल्यावर आम्ही प्रत्येक झाकण उघडून पाहतो. सगळीकडे चेक करतो.

**मा.अजित गव्हाणे –** या कामावर कोणीतरी सुपरवायझर पाहिजे.

**मा.शितोळे- उपअभियंता (ड्रेनेज) –** यापुर्वी रणपिसे हे एकटेच काम करीत होते. आता सुपरवायझरची मागणी केलेली आहे. त्यामुळे आता आम्हाला काहीच माहिती होत नाही.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती -** च-होली येथील एसटीपी टप्पा याबाबत काय झाले?

**मा.शितोळे- उपअभियंता (ड्रेनेज) –** मा.आयुक्त साहेबांकडे फाईल आहे.

**मा.अजित गव्हाणे –** सर्व कामे व्यवस्थित झाली तर भविष्यात आपल्याला काही गरज पडणार नाही.

**मा.शितोळे- उपअभियंता (ड्रेनेज) –** आता जी कामे झालेली आहेत ती २०२६-२०२७ पर्यंत चांगली राहतील अशी कामे केलेली आहे

**मा.अजित गव्हाणे –** कामांचे पुन्हा टेंडर काढणार आहे का? २४ एमएलडीचे जे आहे ते २१ एमएलडी झाले आहे. किती लोकसंख्या आहे?

**मा.शितोळे- उपअभियंता (ड्रेनेज** – सध्या मा.आयुक्त साहेबांकडे सहीकरिता फाईल ठेवली आहे. अडीचलाख लोकसंख्यापर्यंत आहे.

**मा.संजय आहेर (स्विकृत सदस्य) –** ड्रेनेजचे काम केल्यावर ते व्यवस्थित होते का नाही हे पाहिले जाते का? कारण काही ठिकाणी ड्रेनेजचे काम झाल्यावर सहा महिन्यात त्याचे प्लास्टर निघून गेलेले आहे. आपलेकडे सिस्टीम काय आहे? कारण ताथवडे येथील कामाचे तसे झालेले आहे. सगळे प्लास्टर निघून गेलेले आहे. त्या कामाचे जे स्तर लागतात तसे काम करीत आहे का?

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** वॉर्डमधील विद्युतचे कामाचे काय झाले?

**मा.चव्हाण – (उपअभियंता) -** विद्युतची २० कामे आहेत. १५ कामाच्या निविदा काढणार आहे. १९ कामाची निविदा काढणार आहे. ९ कामे झालेली आहे. चार कामे भरायची आहे. नवीन इमारतीची कामे आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती** - च-होली येथील शिल्पाचे काय झाले? स्थापत्य विभाग दोन्ही एकत्र काम करणार आहे. किती दिवस लागतील?

**मा.व्ही.सी.काळे – (उपअभियंता) -** च-होली येथील शिल्पाचे इस्टीमेंट (उर्वरीत कामाचे) तयार करणे. काम आकि टेक मार्फत चालू आहे.

**मा.अजित गव्हाणे –** विद्युत विभागाचे लोकांकडे विद्युतचे साहित्य व्यवस्थित नसते. विद्युतचे काम केले तरी दिवे लागत नाही.

**मां.मंदाताई आल्हाट –** मोशी येथे सगळीकडे एलएडीचे दिवे दया.

**मा.अजित गव्हाणे –** एलएडीचे दिव्यांमध्ये काय फरक आहे? फायदेशीर कोणते आहे ?

**मा.चव्हाण – (उपअभियंता) -** एलएडीचे दिवे फायदयाचे आहेत. एलएडीचे दिव्यांची कामे झालेली आहेत.

**मा.अजित गव्हाणे** – एलएडीचे दिवे गेले की, तुम्हाला चार दिवस लागतात दिवे चालू करायला. सध्या एवढे अडव्हान्स झालेले आहे तरी चार दिवस लागतात दिवे चालू करण्यासाठी. तोपर्यंत नागरीक रोज येऊन आम्हाला सांगतात. आम्हाला त्यांचे ऐकून घ्यावे लागते.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती -** वायरमन व कनिष्ठ अभियंता यांची पदे आपण वाढविली पाहिजे.

**मा.अजित गव्हाणे –** वॉर्डमधील कुठली कुठली कामे झालेली आहेत, कुठली कामे शिल्लक आहेत याची एक यादी करा. अतिक्रमण विभागाचा किती स्टाफ आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – एकूण चार कर्मचारी आहेत. कार्यालयीन अधिक्षक एक अतिक्रमण निरीक्षक, वर्ग ४ चे दोन कर्मचारी असे अतिक्रमण विभागाचा स्टाफ आहे.

**मा.अजित गव्हाणे –** इ क्षेत्रीय कार्यालयामध्ये सगळयात निष्क्रीय अतिक्रमण विभाग आहे. असे समजते की, अतिक्रमण विभागातील कर्मचारी लोकांकडून हप्ते घेतात.

**मा.अतिक्रमण निरीक्षक** – हप्ते घेणारे घेत असतील, मी नाही घेत हप्ते. मी फक्त आपल्या भागातील अतिक्रमण हटविणेचे काम करतो. मला जास्त बोलता येत नाही.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर ,सभापती –** सक्षम कर्मचारी मिळणेबाबत प्रयत्न केला पाहिजे

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** मा.आयुक्त साहेबांनी इ क्षेत्रीय कार्यायाच्या, भोसरी येथील दौरा केला त्यावेळी त्यांनी स्वता: डोईफोडे साहेबानां सांगितले होते इ क्षेत्रीय कार्यालयामध्ये सक्षम अतिक्रमण निरीक्षकाची नेमणूक करण्यात यावी. परंतू आजपर्यंत ती झालेली नाही.

**मा.अजित गव्हाणे** – अधिकृत हॉकर्स आहेत.

**मा.प्रशासन अधिकारी -** हॉकर्स झाल्यावर अतिक्रमण कमी होईल.

**मा.अजित गव्हाणे –** अतिक्रमणबाबत आमचेकडे कारवाई होऊ शकत नाही.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – इ क्षेत्रीय कार्यालयातील अतिक्रमण विषयक कामकाज करण्यासाठी सक्षम अतिक्रमण निरीक्षक मिळणेबाबत वेळोवेळी प्रशासन विभागाला पत्र दिले आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** च-होली येथील १८ मीटर व २४ मीटर रस्ता विकसीत करणेसाठी एवढा वेळ लागतो का? प्रस्तावाला एवढा उशीर करण्याचे काय कारण आहे? आमचेकडील बजेट वाया चाललय. मा.आयुक्त साहेबाकडील डॉकेट असून तुम्ही लक्ष घालत नाही. तो पर्यटन स्थळाचा रस्ता आहे. तुमचे मुख्य कोण आहेत ते मिटींगला का नाही आले? त्यांना बोलवा. तुम्ही कोणाच्या दबावाखाली आहात का? मा.आयुक्त साहेबांकडून तो विषय पुढे वनकेखाली दिला आहे. एक वर्ष झाले, त्या रस्त्यासाठी मी भांडत आहे. जाहीर प्रकटन घ्यायचे आहे.

**मा.गरजे कनिष्ठ अभियंता (नगररचना) -** शिनकर मॅडमकडे फाईल आहे. ४५ मीटर रस्ता आहे तो रस्ता रद्द करायचा आहे. दाभाडेवस्तीचा विषय आहे. आरक्षण होते ते रद्द करण्यासाठी शासनाकडे ते प्रकरण पाठवायचे आहे. ४५ मीटर रस्ता आहे तो ३७ मीटर केलेला आहे.

**मा.अजित गव्हाणे** – काय रिझन दिले आहे?

**मा.गरजे कनिष्ठ अभियंता (नगररचना)**- १६४० चौ.मीटर रस्ता केलेला आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती -** मा.आयुक्तांनी विषय मंजूर करुन सहा महिने झाले आहे. शिनकर मॅडमला कळत नाही. जाहीर प्रकटन करीत नाही. पेपर आऊट करणार आहे. मार्चपर्यंत आपल्याला कामे करायची आहे. आमचा फंड वाया जाणार आहे.

**मा.अजित गव्हाणे –** भूमि संपादन केले आहे. पहिल्या रस्त्याचे काम चालू आहे मग काय अडचण आहे? भूमिसंपादन झाले आहे दोन्ही रस्ते करु शकतो.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** तो पुर्ण रस्ता करुन देत नाही.

**मा.व्ही.सी.काळे – (उपअभियंता)** शेजारी आरक्षण असल्यामुळे करु शकत नाही. तो कॅन्सल करुन दया.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती -** दाभाडेना भेटा, त्यांचेशी बोलून घ्या.

**मा.व्ही.सी.काळे – (उपअभियंता)** रस्ता पुर्ण ताब्यात आहे. मिटींगमध्ये ठराव झालेला आहे. ऐनवेळचा विषय आता वनकेखाली येत आहे.

**मा.मंदाताई आल्हाट** – ग्रामीण भागातील पिण्याचे पाणी कमी करु नका.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.